# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./७८६८/२०२१ दि. ०२/१२/२०२१

## परिपत्रक

संदर्भ :- १. Government of Maharashtra, Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya Mumbai Order No. DMU/2020/CR.92/DisM-1, Dated: 30/11/2021.

२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश जिकावि/आव्यक.अका/३-कार्या.क्र/का. १४४०/२०२१, दि. ०१/१२/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, कोविड-१९ चा प्रादुर्भाव पूर्णपणे गेलेला नसून सध्या कोविड-१९ चे ओमेक्रॉन विषाणूचा फैलाव काही देशांमध्ये झालेले आहे. सदर साथरोगावर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत नागरिकांचे कोविड-१९ संदर्भाने दोन्ही लसीकरण लवकरात लवकर पुर्ण होणे आवश्यक असून सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी मास्कचे वापर करणे अनिवार्य आहे. तसेच कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर अपेक्षित असलेल्या कोविड अनुरुप वर्तनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक करण्यात आले असून त्यामध्ये कसूर करणाऱ्यांवर नियमानुसार दंडाची कार्यवाही करण्याबाबतचे संदर्भिय आदेश प्राप्त झाले आहे.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय आदेशांचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे.

०२/१२/२०२१

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव :-

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
४. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
५. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

02.12.2021

**(डॉ. कामाजी देशमुख)**
उपकुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणगडचिरोली ,

**तळमजला-गडचिरोली ,जिल्हाधिकारी कार्यालय ,**

▸ टोल फ्री क्रमांक १०७७: ▸ हॉटलाईन क्र२००७ :. ▸ दूरध्वनी क्र :.०७१३२-२२२०३५

▸ मोबाईल क्र ९४२३९११०७७ :. ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

**जि-कावि/आव्यक.अका/३-कार्या.क्र/.का.1640/२०२/१** **दिनांक : 01 डिसेंबर,२०२१**

संदर्भ: .1 साथरोग अधिनियम, 1897

2 आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005

.3 महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र: डीएमयु/2020/प्र.क्र.92/डीआयएसएम-1, दिनांक:27 नोव्हेंबर, 2021

4. या कार्यालयाचे आदेश क्र.कार्या-३/अका-आव्यक/कावि/१४३६/२०२१, दि. ३०.११.२०२१

# आदेश

**ज्याअर्थी,** राज्यात तसेच गडचिरोली जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांमध्ये कोविड- 19पॉझिटीव्ह रुग्णांची नोंद सातत्याने कमी प्रमाणात होत आहे. तसेच, देशातील व शेजारच्या राज्यांतील कोविड- 19 रुग्णसंख्येच्या आलेखामध्ये, निरंतर व सातत्याने घट होत आहे. ज्या अर्थी, आवश्यक निर्बंधांचे विविध आस्थापनांकडून कोविड- 19विषयक निबंधाचे पालन करण्यात येत असलेल्या शिस्तीमुळे तसेच बहुसंख्य जनतेने कोविड अनुरूप वर्तन विषयक शिस्त बाळगण्यामुळे यश प्राप्त झाले आहे.

**ज्याअर्थी,** सध्या कोविड- 19 चे ओमेक्रॉन विषाणूचा फैलाव काही देशांमध्ये झालेले असून सदर साथरोगावर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत नागरिकांचे कोविड-१९ संदर्भाने दोन्ही लसीकरण लवकरात लवकर पूर्ण होणे आवश्यक आहे शिवाय सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी मास्कचे वापर करणे अनिवार्य आहे.

**त्याअर्थी,** उक्त संदर्भ क्र.४ अन्वये या कार्यालयाकडून निर्गमित आदेशान्वये विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांकडून तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकाने/आस्थापना यांचेकडून **रीतसर दंड वसूल करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना अर्थात ग्रामीण भागांकरिता संबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक व शहरी भागाकरिता संबंधित भागाचे मुख्याधिकारी यांना देण्यात येत आहे.** नियमाप्रमाणे सदर दंडाची रक्कम संबंधितांकडून घेण्यात येऊन सदर दंडाची रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे खातेत जमा करुन त्यातून कोविड-१९ साथरोग संदर्भाने उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत सौम्यीकरण, क्षमताबांधणी, जनजागृती, वैद्यकीय सुविधा बळकटीकरण, पायाभूत संरचनाशी संबंधित कामे करणे इत्यादी कामांसाठी सदर निधीचा वापर करता येईल.

1 सामान्य प्रशासन

**त्याअर्थी,** उक्त अधिकारांनुसार आवश्यक ती कार्यवाही सर्व संबंधितांनी तात्काळ करावी, जेणेकरुन कोविड-१९ साथरोगावर उचित नियंत्रण मिळविणे शक्य होईल.

**दंडाची तरतूद:**

- या नियमांनुसार अपेक्षित असलेल्या कोविड अनुरूप वर्तनाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, नियमाचे उल्लंघन केल्याच्या प्रत्येक प्रसंगी, रुपये 500/- इतका दंड करण्यात येईल.
- ज्यांनी आपले अभ्यागत, ग्राहक, इत्यादींवर कोविड अनुरूप वर्तन लादणे अपेक्षित आहे अशा संस्थेच्या किंवा आस्थापनेच्या कोणत्याही परिवास्तूत (जागेत), जर एखाद्या व्यक्तीने कसूर केल्याचे दिसून आले तर, त्या व्यक्तीवर दंड लादण्याव्यतिरिक्त, अशा संस्थांना किंवा आस्थापनांना सुद्धा रुपये10 ,000/- इतका दंड करण्यात येईल. जर कोणतीही संस्था किंवा आस्थापना तिचे अभ्यागत, ग्राहक, इत्यादींमध्ये कोविड अनुरूप वर्तनाची अमलबजावणी करण्यामध्ये नियमितपणे कसूर करीत असल्याचे दिसून आले तर, एक आपत्ती म्हणून कोविड-19 ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, अशी संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.
- जर एखाद्या संस्थेने किंवा आस्थापनेने स्वत: च कोविड अनुरूप वर्तनाचे (CAB) किंवा प्रमाण कार्यचालन कार्यपद्धतीचे (SOP) पालन करण्यात कसूर केली तर ती प्रत्येक प्रसंगी रूपये 50,000/- इतक्या दंडास पात्र असेल. वारंवार कसूर केल्यास एक आपत्ती म्हणून कोविड-19 ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत ती संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.
- जर कोणत्याही टॅक्सीमध्ये किंवा खाजगी वाहतूक करणाऱ्या चारचाकी वाहनात किंवा कोणत्याही बसमध्ये, कोविड अनुरूप वर्तनात कसूर केली जात असल्याचे आढळून आले तर, कोविड अनुरूप वर्तनात कसूर करणाऱ्या व्यक्तींना रूपये 500/- इतका दंड करण्यात येईल, तसेच सेवा पुरविणारे वाहनचालक, मदतनीस, किंवा वाहक यांना देखील रूपये 500/- इतका दंड करण्यात येईल. बसेसच्या बाबतीत, मालक परिवहन एजन्सीस, कसूरीच्या प्रत्येक प्रसंगी, रुपये 10,000/- इतका दंड करण्यात येईल. वारंवार कसूर केल्यास, एक आपत्ती म्हणून कोविड-19 ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, संबंधित मालक एजन्सीचे लायसन काढून घेण्यात येईल किंवा तिचे परिचालन बंद करण्यात येईल.
- कोविड अनुरूप वर्तणुकी संबंधीच्या वर नमूद केलेल्या नियमांचे, पालन करणे अनिवार्य असून त्यांचे उल्लंघन केल्यास वर नमूद केल्यानुसार दंड व शास्ती करण्यात येईल तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 नुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे उल्लंघन करणाऱ्यांवर इतर कोणताही दंड किंवा शास्ती लादता येईल. कोविड अनुरूप वर्तनाचे नियम / धोरणे, वरील प्रमाणे असतील आणि त्यामध्ये

विशेषरीत्या नमूद न केलेले कोविड अनुरूप वर्तनाशी संबंधित असणारे इतर कोणतेही विषय/मुद्दे, राज्य शासनाच्या अंमलात असलेल्या प्रचलित नियमांनुसार / आदेशांनुसार असतील.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदर आदेश आज दिनांक ०१/१२/२०२१ रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ,गडचिरोली**

प्रतिलिपी – **<u>माहितीस्तव सादर</u>**

१. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर

**माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित**

३. पोलीस अधिक्षक, गडचिरोली
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली
५. अपर जिल्हाधिकारी,गडचिरोली/अहेरी
६. उप विभागीय अधिकारी, (सर्व)
७. पोलीस उप विभागीय अधिकारी (सर्व)
८. जिल्हा शल्य चिकित्सक,सा.रु. गडचिरोली
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. गडचिरोली
१०. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जि. प. गडचिरोली यांनी उक्त आदेश जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींना पाठवावे.
११. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,(सर्व)
१२. गट विकास अधिकारी,(सर्व)
१३. जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली यांनी वरीलप्रमाणे बाब विनामुल्य प्रसिध्द करावी
१४. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन, गडचिरोली
१५. मुख्याधिकारी, नगर परिषदा/पंचायती (सर्व)
१६. सर्व शासकिय /निमशासकिय विभागप्रमुख ,कार्यालय प्रमुख (सर्व गडचिरोली जिल्हा)
१७. स्थळ प्रत

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ,गडचिरोली**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 30th November, 2021

**ORDER**

---

**Reference:**

a. The Epidemic Diseases Act, 1897
b. The Disaster Management Act, 2005

The Omnicron variant of the COVID 19 virus has been detected in South Africa and some other countries and has been declared as a variant of concern by the World Health Organisation. GOI has declared some countries as Countries at – risk.

In the wake of the same, in order to restrict the transmission of the said virus variant into the State, in exercise of the powers conferred under the Disaster Management Act, 2005, the undersigned in the capacity of the Chairperson of the State Executive Committee of the State Disaster Management Authority hereby declares that with immediate effect, the following restrictions on air travel into the state are hereby imposed:

a. The restrictions imposed by the Government of India guidelines dated 28th November, 2021 as well as future restrictions if any, shall act as minimum restrictions to be imposed.
b. DCP immigration and FRRO to draft a proforma of declaration for all arriving passengers on international flights to declare details of the countries visited in last 15 days. MIAL to share the proformas with all airlines and the information regarding travel in the last 15 days shall be cross checked by immigration on arrival. An incorrect information furnished by the passenger shall lead to action under relevant sections of the Disaster Management Act, 2005.
c. The international passengers arriving from At Risk countries (declared by GOI from time to time) may be deplaned on priority and separate counters will be arranged by MIAL and Airport Authority for their checking. Such all passengers shall have to undergo mandatory 7 day institutional quarantine and RTPCR test to be carried out on days 2, 4 and 7 for these passengers. If any of the test is found to be positive, then the passenger shall be shifted to a hospital. In case of all tests coming negative, the passenger will have to undergo a further 7 days of home quarantine.
d. Passengers from any other countries except the at risk countries will have to compulsorily undergo RTPCR test at the airport on arrival and on being found negative, will have to undergo 14 days of home quarantine. If found positive, they will be shifted to the hospital.
e. In case of an international passenger having a connecting flight to any other airport in India (without leaving the airport at all), passenger shall undergo a RTPCR test at the first arrival airport in Maharashtra and only on being found negative will he be allowed to board the connecting flight. Information about such passengers shall be passed on by

airline of the connecting flight to the destination airport before take-off so that destination airport can make arrangements for segregating these passengers on arrival thereat. In case such a passenger is taking a connecting flight to an airport in Maharashtra, passenger shall be subjected to quarantine rules mentioned herein for landing directly from an international source.

f. In the case of domestic air travel, passengers travelling within the State will either have to be fully vaccinated or compulsorily carry a RTPCR test within 48 hours of the time of arrival.

g. In case of passengers from other States, negative RTPCR test within 48 hours of arrival will be compulsory without exceptions.

BY ORDER OF AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

**(Debashish Chakrabarty)**
**Chief Secretary**